दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) मुख्य परीक्षा-2014



JO5

2014

(JMFC (M) 2014)

२०१४

परीक्षा दि. 12/10/2014

**PAPER - I**

**पेपर क्रमांक - १**

**Civil Procedure Code, Transfer of Property Act, Specific Relief Act, Law of Contracts, Sale of Goods Act and Partnership Act**

**सिव्हील प्रोसिजर कोड, ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी अ‍ॅक्ट, स्पेसीफिक रिलिफ अ‍ॅक्ट, लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट, सेल ऑफ गुडस अ‍ॅक्ट आणि पार्टनरशिप अ‍ॅक्ट**

**Time : 3 Hours** | **Max. Marks : 100**

**वेळ : 3 तास** | **गुण : 100**

**Note :**

**सूचना :**

(1) **All** questions are **compulsory**.

(१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.

(2) Question No. **1** carries **20** marks. **All** other questions carry **equal** marks i.e. **16** marks **each**.

(२) प्रश्न क्रमांक **१** ला **२०** गुण असून उर्वरित **सर्व** प्रश्नांना **समान** म्हणजेच **१६** गुण आहेत.

(3) Your answers must be to the point, wherever possible quoting the specific provision of law.

(३) उत्तरे मुद्देसुद असावीत, आवश्यक तेथे कायद्यातील तरतुदीं नमूद कराव्यात.

(4) Do not reproduce any question. Write only question number against the answer.

(४) उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नये. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करुन उत्तर लिहावे.

(5) Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.

(५) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतील त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.

(6) "Other than cited cases, a candidate should not write roll number, any name (including one's own), signature, address or any indication of one's identity anywhere inside the answer book otherwise the one will be penalised."

(६) ''उदाहरणादाखल दिलेल्या प्रकरणाशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये. **अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल''.**

(7) English version of the question shall be held to be authentic in case of any ambiguity.

(७) कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, इंग्रजी वर्णन अधिकृत समजले जाईल.

SEAL

**P.T.O.**

(8) **All** the questions should be attempted in one and the same language either in **English** or in **Marathi**.

(८) उमेदवाराने **सर्व** प्रश्नांची उत्तरे **इंग्रजी** किंवा **मराठी** यापैकी एकाच सारख्या भाषेत लिहिली पाहिजेत.

(9) Candidates are expected to answer all the sub-questions of a question together. If sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later sub-question shall be overlooked.

(९) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तदनंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

---

**1.** Write a Judgement on the basis of the facts narrated below :

खाली नमूद केलेल्या कथनावरुन न्यायनिर्णय लिहा :

While writing Judgement :

(a) adhere to the contents of Judgement as required under the Code of Civil Procedure.

(b) frame and answer the issues properly.

(c) whenever necessary, fill up the details from your imagination.

(d) give legal, logical and proper reasons for your findings.

(e) conclude the Judgement with a proper Operative Order.

न्यायनिर्णय लिहिताना :

(अ) दिवाणी आचार संहितेमध्ये अभिप्रेत असलेल्या मसूद्याचे पालन करा.

(ब) योग्य ते मुद्दे काढा आणि त्यांची योग्य ती उत्तरे लिहा.

(क) आवश्यकतेनुसार तुमच्या कल्पनाशक्तीनुसार तपशील द्या.

(ड) तुमच्या निष्कर्षांच्या पुष्ट्यर्थ तर्कसंगत, कायदेशीर व योग्य कारणे द्या.

(इ) योग्य तो अंतिम आदेश लिहून न्यायनिर्णयाचा शेवट करा.

---

### Averments in the Plaint

Plaintiff and Defendant No. 1 start business in partnership investing 1/2 share each in the capital of the business. Defendant No. 2 is the brother of Defendant No. 1. He gives his premises for running the business without charging any rent. Subsequently Defendant No. 1 retires and his minor son is accepted as partner. After some period, plaintiff files a suit for dissolution of partnership firm claiming half share in capital and profit and requesting the court for settlement of accounts.

### Averments in the written statement

Defendants request for dismissal of the suit on following the grounds :

(1) As partnership Firm is not registered, suit itself is not tenable.

(2) Plaintiff alone cannot take a decision of dissolution of partnership. Defendants want to continue with the business.

(3) Plaintiff does not have half the share in capital and profit. Defendant No. 2 is also a silent partner and entitled to $\frac{1^{rd}}{3}$ share as the partnership premises belong to him.

(4) As the son of Defendant No. 1 a is minor a suit is not tenable against him and his share cannot be liable for the loss, if any, in the business.

### वादपत्रातील कथने

वादी व प्रतिवादी नं. १ हे एकत्र येऊन भागीदारीच्या व्यवसायाला सुरुवात करतात. दोघेही निम्मे-निम्मे भांडवल व्यवसायात घालतात. प्रतिवादी नं. २ हा प्रतिवादी नं. १ चा भाऊ आहे. प्रतिवादी नं २ हा त्याची जागा भागीदारी व्यवसायासाठी काहीही भाडे न घेता वापरण्यास देतो. दरम्यान प्रतिवादी नं. १ व्यवसायातून निवृत्त होतो आणि त्याच्या अज्ञान मुलाला भागीदार म्हणून सामील केले जाते. काही काळाने वादी भागीदारी संस्था संपुष्टात आणावी व त्याचा भांडवल व नफ्यामधला निम्मा हिस्सा मिळावा व त्यासाठी हिशोब घेण्यात यावा म्हणून दावा करतो.

### कैफियतीतील कथने

प्रतिवादी खालील कारणांसाठी दावा रद्द करण्याची विनंती करतात :

(1) भागीदारी संस्था नोंदणीकृत नसल्याने हा दावा चालणार नाही.

(2) वादीला भागीदारी संपुष्टात आणण्याचा एकतर्फी निर्णय घेता येणार नाही. प्रतिवादींना व्यवसाय चालू ठेवायचा आहे.

(3) वादीचा भांडवल व नफ्यात निम्मा हिस्सा नाही प्रतिवादी नं. २ हा ही सुप्त भागीदार आहे कारण त्याने त्याची जागा व्यवसायासाठी दिलेली आहे त्यामुळे त्याचाही $\frac{1}{3}$ हिस्सा आहे.

(4) प्रतिवादी नं. १ चा मुलगा अज्ञान असल्याने त्याचे विरुद्ध दावा चालू शकत नाही आणि व्यवसायातील नुकसानीमध्ये त्याचा हिस्सा असणार नाही.

---

2. Answer **any two** of the following sub-questions :

खालीलपैकी **कोणत्याही दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) Discuss the statement "Exclusion of Civil Court's jurisdiction is not to be readily inferred".

(अ) "दिवाणी न्यायालयाला अधिकारता नाही असे अनुमान सहजासहजी काढता येवू नये". या विधानाची चर्चा करा.

(b) Discuss in detail provisions relating to execution of money decree from garnishee.

(ब) ऋणको च्या कर्जदाराकडून पैशाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी यासंबंधी तरतूदींची सविस्तर चर्चा करा.

(c) "If one suit is disposed of, second suit in respect of the same property between the same parties cannot be tenable". Discuss this statement.

(क) "एक दावा निकाली झाल्यानंतर त्याच मिळकतीबाबत त्याच पक्षकारांमध्ये दुसरा दावा कायदेशीररित्या चालू शकत नाही". या विधानाची चर्चा करा.

---

3. Write short notes on **any four** of the following :

खालीलपैकी **कोणत्याही चार** संदर्भात टिपा लिहा :

(a) Suits by or against corporations

(अ) महामंडळानी केलेले किंवा महामंडळाविरुद्धचे दावे

(b) Rights and liabilities of mortgagee

(ब) गहाणधारकाचे अधिकार व दायित्वे

(c) Execution of a decree for specific performance of contract

(क) विशिष्ट करार पुरे करुन देण्याच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी

(d) Performance of Reciprocal Promises

(ड) परस्पर अभिवचनांचे पालन

(e) Suit for possession of immovable property based on previous possession

(इ) पूर्व ताब्यावर आधारित अचल मिळकतीचा ताबा मागण्याचा दावा

---

4. Answer **any two** of the following sub-questions :
खालीलपैकी **कोणत्याही दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) Discuss the relevant provisions of Injunction under the code of Civil Procedure and Injuction under the Specific Relief Act.

(अ) दिवाणी आचार संहिता आणि विशिष्ट दिलासा कायदा यामधील ताकीदीच्या हुकुमासंबंधातील तरतूदींची चर्चा करा.

(b) Elaborate the correctness of the statement, "lease and licence are two different transactions".

(ब) ''भाडेपट्टा व वापराची परवानगी हे दोन्ही वेगळे व्यवहार आहेत'' या विधानाच्या सत्यतेची सविस्तर चर्चा करा.

(c) Discuss under which circumstances specific performance cannot be granted ?

(क) कोणत्या परिस्थितीमध्ये विशिष्ट दिलासा कराराची पूर्तता करता येणार नाही याची चर्चा करा.

---

5. Answer **any two** of the following sub-questions :
खालीलपैकी **कोणत्याही दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) Discuss the terms 'Ostensible owner and Fradulent owner'.

(अ) 'वरकरणी मालक' आणि 'कटपूर्ण मालक' या दोन शब्द समुदायाची चर्चा करा.

(b) Discuss whether the powers of the Court Commissioner and the Court Receiver are the same or different ?

(ब) न्यायालयाने नेमलेल्या आयोगाचे व न्यायालयाने नेमलेल्या रिसिव्हरचे अधिकार सारखेच की वेगळे असतात याची चर्चा करा.

(c) "Once goods are sold, the seller ceases to have any rights and liabilities". Discuss the statement.

(क) ''एकदा माल विकला की विक्रेत्याचे हक्क व जबाबदाऱ्या संपुष्टात येतात''. या विधानाची चर्चा करा.

---

6. Answer **any two** of the following sub-questions :
खालीलपैकी **कोणत्याही दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) Discuss the statement, "Once the trial starts, amendment in pleadings cannot be permitted".

(अ) ''एकदा दाव्याच्या चौकशीस सुरुवात झाल्यावर वादी-प्रतिवादींच्या कथनामध्ये दुरुस्ती/सुधारणा करता येत नाहीत''. या विधानाची चर्चा करा.

(b) Discuss "onerous gifts" and "universal donee".

(ब) ''सभार दान'' आणि ''सर्वस्व आदाता'' यांची चर्चा करा.

(c) Discuss provisions relating to cancellation of instruments.

(क) दस्तऐवज रद्द करण्याबाबतच्या तरतूदींची चर्चा करा.

(d) Free Consent

(ड) मुक्त संमती

---

-o0o-

दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व
न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) मुख्य परीक्षा-२०१४
(JMFC (M) 2014)
परीक्षा दि: 12/10/2014



2014

२०१४

**PAPER - II**

**पेपर क्रमांक - २**

**Indian Penal Code, Evidence Act, Code of Criminal Procedure,
SC & ST (Prevention of Atrocities) Act, 1989 and Protection of Civil Rights Act, 1955,
Essay on Current Legal Topic**

**इंडियन पिनल कोड, एव्हीडन्स् ॲक्ट, कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर,
एससी अँड एसटी ( प्रिव्हेन्शन ऑफ ॲट्रासिटीज ) ॲक्ट, 1989 अँड प्रोटेक्शन ऑफ सिव्हील राईटस् ॲक्ट, 1955,
करंट लिगल टॉपिकवरील निबंध**

**Time : 3 Hours** | **Max. Marks : 100**

**वेळ : 3 तास** | **गुण : 100**

**Note :**

**सूचना :**

(1) Question Nos. **9** and **10** are **compulsory**.

(१) प्रश्न क्रमांक **९** व **१०** **अनिवार्य** आहेत.

(2) Answer **any six** from the remaining questions.

(२) उर्वरित प्रश्नांमधून कोणतेही **सहा** प्रश्न सोडवावेत.

(3) Marks to **each** question are indicated by figure in the margin on right hand.

(३) प्रश्नासमोरील उजव्या बाजूच्या समासातील अंक गुण दर्शवितात.

(4) Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.

(४) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतील त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.

(5) Do not reproduce any question. Write only question number against the answer.

(५) उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नये. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करुन उत्तर लिहावे.

(6) Other than cited cases, a candidate should not write roll number, any name (including one's own), signature, address or any indication of one's identity anywhere inside the answer book otherwise the one will be penalised.

(६) उदाहरणदाखल दिलेल्या प्रकरणांशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

**P.T.O.**

(7) **English** version of the question shall be held to be authentic in case of any ambiguity.

(७) कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, **इंग्रजी** वर्णन अधिकृत समजले जाईल.

(8) **All** the questions should be attempted in one and the same language either in **English** or in **Marathi**.

(८) उमेदवाराने **सर्व** प्रश्नांची उत्तरे **इंग्रजी** किंवा **मराठी** यापैकी एकाच सारख्या भाषेत लिहिली पाहिजेत.

(9) Candidates are expected to answer all the sub questions of a question together. If sub question of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later sub question shall be overlooked.

(९) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तदनंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

---

**1.** Explain the difference between a warrant trial and a summons trial. **10**

वॉरंट आणि समन्स खटल्यांच्या संपरिक्षे मधील फरक स्पष्ट करा.

---

**2.** Write short notes on **any two** :

**कोणत्याही दोन** बाबींवर संक्षिप्त टिपा लिहा :

(a) Facts of which a court must take a judicial notice. **5**

(अ) न्यायालयाने ज्यांची न्यायिक दखल घेतलीच पाहिजे अशी तथ्ये.

(b) Difference between an admission and a confession. **5**

(ब) कबुली आणि कबुलीजबाब यातील फरक स्पष्ट करा.

(c) Impeaching credit of a witness. **5**

(क) साक्षीदाराच्या विश्वासार्हतेवर संशय घेणे.

(d) Competency of an accomplice to testify and precaution to be taken while appreciating his evidence. **5**

(ड) सहअपराध्याची साक्ष देण्याची सक्षमता आणि त्याच्या साक्षीचे ग्रहण करताना घ्यावयाची काळजी.

---

**3.** Explain in detail the right of private defence with special reference to the instances when it extends to causing death. **10**

खाजगीरित्या बचाव करण्याच्या आणि विशेषत: मृत्यू घडविणे पर्यंतच्या हक्काचे विवेचन करा.

---

4. Write the difference between *any four* :
फरक लिहा ( ***कोणतेही चार*** ) :

(a) Common Intention and Common Object 2½
(अ) समान हेतू आणि समान लक्ष्य

(b) Theft and Extortion 2½
(ब) चोरी आणि बलाद्ग्रहण

(c) Preparation to commit dacoity and assembling for the purpose of dacoity 2½
(क) दरोडा घालण्याची पुर्वतयारी आणि दरोडा घालण्यासाठी एकत्र जमणे

(d) Wrongful Restraint and Wrongful Confinement 2½
(ड) गैर निरोध आणि गैर परिरोध

(e) Kidnapping and Abduction 2½
(इ) अपनयन आणि अपहरण

(f) Criminal trespass and House trespass 2½
(फ) फौजदारीपात्र अतिक्रमण आणि गृह-अतिक्रमण

---

5. Explain with illustrations when the charges can be joined ? 10
दोषारोपांचे संयोजन कधी करता येईल हे सहोदारण विशद करा.

---

6. Answer **any two** :
**कोणत्याही दोघांची** उत्तरे लिहा :

(a) What is the use of the diary to be maintained by an investigating officer during trial ? 5
(अ) अन्वेषण अधिकाऱ्याने ठेवावयाच्या नोंदवहीचा वापर खटल्याच्या वेळी कसा होऊ शकतो ?

(b) When unlawful compulsory labour constitutes 'untouchability' ? 5
(ब) अवैधपणे सक्तीने श्रम करावयास लावणे हे 'अस्पृश्यता' पालन आहे असे केंव्हा मानावे ?

(c) What are the presumptions as to the offences under the Scheduled Castes and the Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act, 1989 ? 5
(क) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, 1989 मधील गुन्ह्यां संदर्भात कोणती तथ्ये गृहीत धरली जातात ?

(d) When police may arrest without warrant ? 5
(ड) वॉरंट शिवायही पोलीस केंव्हा अटक करू शकतात ?

---

7. Write a detailed note on presumptions of facts and law with reference to their effect. 10
तथ्य आणि कायदे विषयक गृहितकांबाबत आणि त्यांच्या परिणामांच्या संदर्भाने विस्तृत टिप्पणी लिहा.

---

8. Write short notes (**any two**) :
संक्षिप्त टिपणी लिहा ( **कोणत्याही दोन** ) :

(a) Stoppage of summons case trial — 5
(अ) समन्स खटला थांबवणे

(b) Closure report of a case — 5
(ब) प्रकरण बंदचा अहवाल

(c) Levy of fine — 5
(क) द्रव्यदंड वसूली

(d) Further investigation by investigation officer — 5
(ड) अन्वेषण अधिकाऱ्याने करावयाचा अधिक तपास

---

9. Write an essay on **any one** topic (**800 words**) : — **20**
**कोणत्याही एका** विषयावर निबंध लिहा ( ८०० शब्द ) :

(a) Increasing participation of children in sexual offences - a challenge.
(अ) लैंगिक अपराधांमध्ये मुलांचा वाढता सहभाग - एक आव्हान.

(b) Collegium system of appointment of Judges Versus Judges Appointment Commission.
(ब) न्यायमुर्तीच्या गटाने न्यायमुर्ती नेमण्याची प्रणाली विरुद्ध न्यायमुर्ती नेमणूका आयोग.

(c) Witness protection - a challenge to judicial administration.
(क) साक्षीदार संरक्षण - न्यायिक प्रशासना पुढील एक आव्हान.

---

10. Write a judgement on the following facts : — **20**
खालील तथ्यांआधारे निकालपत्र लिहा :

A & B are ferry operators doing their business across the same creek. One night 'A' carries the boat of 'B' to the otherside of the creek clandestinely and leaves it there duly anchored. On the complaint of 'B' police carryout investigation. 'A' is arrested and chargesheeted in the court of JMFC Alibag. Boat is found intact and is seized during investigation.

During trial enough reliable evidence is led to attribute authorship of the incident to 'A'.

Asstt. Govt. Prosecutor argues that theft by 'A' is duly established. According to the defence that 'A' had not retained the boat which is intact and there was no gain to him. Alternatively A claimed benefit of the probation of offenders Act.

'अ' आणि 'ब' एकाच खाडीमधे बोटींनी प्रवासी वाहतूकीचा व्यवसाय करतात. एका रात्री 'अ' गुपचुप 'ब' ची बोट खाडीच्या पैलतीरी नेवून योग्यरित्या नांगर टाकून ठेवतो. 'ब' च्या फिर्यादीवरून पोलीस तपास करतात. तपासात बोट पुर्वावस्थेत आढळते आणि ती जप्त करण्यात येते. 'अ' विरुद्ध पोलीस अलीबाग येथील न्या.दं.प्र.व. यांच्या न्यायालयात दोषारोप पत्र पाठवतात.

खटल्यात 'अ' ने सदर कृती केल्याचा पुरेसा स्विकारार्ह पुरावा आहे.

सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी असा युक्तिवाद केला की 'अ' ने चोरी केल्याचे सिद्ध होते. बचाव पक्षाने असा पवित्रा घेतला की 'अ' ने सदर बोट कायमस्वरूपी स्वत:कडे ठेवलेली नाही आणि ती पुर्वावस्थेत आहे, त्यास कोणताही फायदा झालेला नाही. विकल्याने 'अ' ने परिविक्षा अधिनियमाचा फायदा देण्याची मागणी केली.

---

-o0o-